**जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमाचा केंद्र हिश्श्याचा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला वितरित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जजीमि-२०२०/प्र.क्र.११० (भाग-३)/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: ८ फेब्रुवारी,२०२१

**वाचा:-**

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र जजमि.२०२०/प्र.क्र.१३८/पापु १०(०७),दि.०४.०९.२०२०
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम २०२०/ प्र.क्र.९६/पापु १०, दि.१५.०९.२०२०
३. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.बीयुडी-२०२०/ प्र.क्र.१०/का-६, दि.१९.०१.२०२१

**<u>प्रस्तावना-</u>**

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करुन नवीन जल जीवन मिशनची सुरवात केली आहे. जल जीवन मिशनबाबत दि.२५.१२.२०१९ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत ग्रामीण अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना पेयजल पुरवठा करण्यात येतो. वित्तीय वर्ष २०१९-२०२० मधील आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आहरित करता न आलेला केंद्र हिश्श्याचा निधी वित्त विभागाने चालु वित्तीय वर्षात वितरित करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार लेखाशीर्ष २२१५ ९८५३ (केंद्र हिस्सा) खाली संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये रु.१४.०० कोटी इतका निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर लेखाशीर्षान्तर्गत चालु वित्तीय वर्षात अर्थसंकल्पित रु.७०.०० कोटी निधीपैकी उर्वरित रु.५६.०० कोटी इतका निधी वित्त विभागाने वितरित करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने संदर्भिय क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये विभागास रु.५६.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२०- २०२१ या आर्थिक वर्षामध्ये मागणी क्र. टी-५, २२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१, पाणी पुरवठा, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम यासाठी अनुदान (केंद्र हिस्सा ५० टक्के) (कार्यक्रम) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९८५३) या लेखाशीर्षाखाली रु.५६.०० कोटी (अक्षरी-छप्पन कोटी फक्त) इतका निधी वितरणास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. हा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशनला जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीकरीता उघडण्यात आलेल्या राज्य नोडल खातामध्ये वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी तात्काळ राज्य पाणी व स्वच्छता मिशन (जल जीवन मिशन) या नावाने उघडण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, मुंबई (IFSC Code- SBIN ०००००३००) येथील राज्य नोडल खाते क्र.३९२२२५४८२४२ मध्ये जमा करण्यात यावा. हा निधी जमा झाल्यानंतर पुढील सर्व आवश्यक कार्यवाही मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन) यांच्याद्वारे करण्यात यावी.

२. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन) यांनी उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशीर्षानिहाय/ उपलेखाशीर्षानिहाय साध्य झालेल्या भौतिक उद्दिष्ट्ये, निधी उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी माहिती या विभागास व उप सचिव(कार्यासन-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

३. राष्ट्रीय पाणी गुणवत्ता उप मिशन (NWQMS) अंतर्गत सन २०१८-२०१९ या वर्षातील आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत (केंद्र हिश्श्याचा) रु. ६३.२५ लक्ष अखर्चित निधी लेखाशीर्ष २२१५ ९८५३ मधील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यास वित्त विभागाने मान्यता दर्शविली आहे. त्यानुसार चालु वित्तीय वर्षात राष्ट्रीय पाणी गुणवत्ता उप मिशन अंतर्गत केंद्र हिश्श्याच्या निधी करीता क्षेत्रिय कार्यालयांची मागणी आल्यास रु.६३.२५ लक्ष मर्यादेपर्यंतचा निधी लेखाशीर्ष २२१५ ९८५३ खालील उपलब्ध तरतूदीतून वितरित करण्यात यावा व याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवण्यात यावेत.

३. सदर रक्कम आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी अवर सचिव (रोखशाखा) (श्री.पां.रा.खोटरे) यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री.रा.म.गेंगजे), पाणी

पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम (श्री.पां.रा.खोटरे) आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोखशाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, फोर्ट, मुंबई मुख्य शाखा, मुंबई (IFSC Code- SBIN ००००३००) येथे उघडण्यात आलेल्या राज्य नोडल खाते क्र.३९२२२५४८२४२ मध्ये जमा करावी.

४. प्रस्तुत प्रकरणी वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं २०२०/ प्र.क्र.६४/अर्थ-३, दि.१६.०४.२०२० सोबतच्या परिशिष्ठातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र.९ मधील तपासणी सूचीतील अ.क्र.१ ते १० मधील अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौ.संदर्भ क्र.३०७/व्यय-३ (वित्त), दि.३०.१२.२०२० व आदिवासी विकास विभागाचे अनौ.संदर्भ क्र.३३७/का-६, दि.२३.१२.२०२० अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०२०८१६०७४४२७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.02.08 16:58:59 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,
१. श्री.रा.म.गेंगजे, उप सचिव, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. श्री.पां.रा.खोटरे, अवर सचिव, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रत,
१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
४. महालेखापाल (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई/ २- नागपूर
५. मिशन संचालक, जल जीवन मिशन, बेलापूर, नवी मुंबई
६. उप सचिव (का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
९. कार्यासन पापु-०४/२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.निवडनस्ती (पापु १०)